# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.07.2025** **वार-मंगळवार**

---

**घरकुल**

पुणे जिल्ह्यात घरकुलांसाठी पात्र परंतु स्वतःची जमीन नसलेल्या 976 भूमिहीन नागरिकांना घरकुलं मंजूर झाली आहेत. त्यासाठी गायरान जमिनीचा उपयोग करून लाभार्थ्यांना बांधकामासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली. अजूनही काही प्रस्ताव प्रलंबित आहेत. घरकुल बांधण्यासाठी जागा उपलब्ध होत नसल्यानं जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद प्रशासनाकडून समन्वयानं जागा शोधून त्या ठिकाणी घरकुलं मंजूर करण्यात येत आहेत. काही ठिकाणी क्लस्टर पद्धतीनं घरकुलं बांधण्याबाबतही चाचपणी प्रशासनाकडून सुरू आहे.

**पिकविमा**

राज्यात पंतप्रधान पीकविमा योजनेमध्ये आत्तापर्यंत 1 लाख 25 हजार 836 शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आहे. तर पीक विम्याखालील क्षेत्र 78 हजार 731 हेक्टर आणि 422 कोटी 56 लाख रुपयांचा पीकविमा संरक्षित रक्कम असल्याची माहिती कृषी आयुक्तालयातून देण्यात आली. खरीपात पीकनिहाय प्रति हेक्टरी विमा संरक्षित रक्कम ही प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळी आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांनी भरावयाचा पीकविमा हप्ता हा दोन टक्के आहे. शेतकऱ्यांना योजनेतील सहभागासाठी ॲग्रिस्टॅक नोंदणी बंधनकारक असून ई-पीक पाहणी शंभर टक्के करणं आवश्यक राहणार आहे. पीकविमा योजनेत शेतकऱ्यांना 31 जुलैपर्यंत सहभाग घेता येणार आहे असं कृषी आयुक्तालयातील मुख्य सांख्यिक वैभव तांबे यांनी सांगितलं.

**पिकस्पर्धा**

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्याच्या उद्देशानं सन 2025-26 साठी कृषी विभागामार्फत खरीप आणि रबी हंगामातील 16 पिकांसाठी अन्नधान्य, कडधान्य आणि गळीतधान्य राज्यांतर्गत पीकस्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. मूग आणि उडीद पिकासाठी स्पर्धेत 31 जुलैपर्यंत तसंच भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, सोयाबीन, भुईमूग आणि सुर्यफुल पिकांसाठी 31 ऑगस्टपर्यंत अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा असं आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. या स्पर्धेअंतर्गत खरीप 11 आणि रबी हंगामातील 5 अशा एकंदर 16 पिकांसाठी स्पर्धा घेतली जाणार आहे. रबी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा, करडई आणि जवस या पिकांचा समावेश असून त्यासाठी 31 डिसेंबरपर्यंत सहभाग घेता येईल.

**मिळकतकर**

पुणे महापालिकेनं मिळकतीमधील सर्वसाधारण करामध्ये दिलेल्या पाच टक्के सवलतीचा लाभ यंदा 7 लाख 75 हजार मिळकतधारकांना मिळाला आहे. त्यांनी 1 हजार 411 कोटी रुपये कर भरला आहे. कर भरण्यात अडचण येत असल्यामुळं पुणे महापालिकेनं सवलतीची मुदत वाढवून 7 जुलैपर्यंत केली होती.

**सेपरेटर**

संगमवाडीवरून येरवडा, लोहगाव विमानतळ तसंच विश्रांतवाडीकडं जाताना होणारी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी पुणे महापालिकेनं बिंदूमाधव ठाकरे चौकात उड्डाणपूल तसंच ग्रेड सेपरेटर उभारण्याचा निर्णय घेतला आहे. स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.

**पवना**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं पवना नदीच्या पुनरुज्जीवनासाठी महत्वाकांक्षी प्रकल्पाचं नियोजन केलं आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहणाऱ्या पवना नदीची लांबी 24 किलोमीटर आहे. प्रकल्पामध्ये नदी काठाचं संरक्षण, झीज टाळणं, जैव विविधता वाढविणं, पक्षांची घरटी, निवासस्थाने निर्माण करणं, जवळचे जलाशय आणि नदीमध्ये जलचरांची वाढ करणं समाविष्ट आहे.

**मेट्रो**

पुणे मेट्रोच्या दोन्ही मार्गीकांसाठी नवीन 12 मेट्रो ट्रेन दाखल होणार आहेत.  या नवीन मेट्रो ट्रेन संपूर्णपणे मेक इन इंडिया अंतर्गत तयार करण्यात येणार असून ऍल्युमिनियमपासून निर्मित आहेत. या खरेदी कराराची एकंदर रक्कम 430 कोटी रुपये असल्याची माहिती पुणे मेट्रोनं दिली आहे.

**पाणी**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत आज सकाळी सहा वाजेपर्यंत साडे एकोणीस टीएमसी म्हणजे 67 टक्के पाणीसाठा झाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा साडेतेवीस टक्के होता. खडकवासला धरणातून आतापर्यंत साडेचार टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.

**टेबल टेनिस**

ठाण्यामध्ये आयोजित प्रतिक तुलसानी चषक पहिल्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. अकरा वर्षांखालील मुलांच्या गटात  वरदान कोलते आणि मुलींच्या गटात अहना गोडबोले यांनी तर 13 वर्षाखालील गटात निरव मुळे यांनी उपविजेते पदावर आपली मोहोर उमटवली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश साधारण ढगाळ राहून पावसाच्या मध्यम सरी पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**